CMYK

बीड । सोमवार

२८.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : २८

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 






# मुंबई : रेल्वे स्थानकांवर 10 हजार सीसीटीव्ही कॅमेरांची नजर

## पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणा सतर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

जम्मू काश्मिरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सार्वजनिक ठिकाणांवरील सुरक्षा अधिक सक्षम करण्यात येत असून मुंबईकर रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी रेल्वे स्थानके आणि परिसरातील १० हजार सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून प्रभावी देखरेख करण्यात येत आहे. मुंबईतील दैनंदिन प्रवासी आणि देश-विदेशातील पर्यटकांच्या सुरक्षेसाठी रेल्वे पोलीस सज्ज आहेत. मुंबई रेल्वे पोलीस आयुक्तालयांतर्गत मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील १३९ रेल्वे स्थानके आहेत. या मार्गावरून दिवसभरात लोकलच्या सुमारे ३,२०० लोकल फेऱ्या होतात. त्यातून दैनंदिन ७५ ते ८० लाख प्रवासी प्रवास करतात. यासह लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांच्या शेकडो फेऱ्या होतात. हजारोंच्या संख्येने प्रवाशांचा प्रवास होतो. रेल्वे आयुक्तालयांतर्गत या सर्व रेल्वे स्थानकावर सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे प्रवशांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून देखरेख केली जात आहे.

मध्य, पश्चिम रेल्वेवरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर ताफा वाढविला आहे. प्रत्येक लोकलमध्ये श्वान पथके तपासणी करत आहेत. पश्चिम रेल्वे मार्गावरील चर्चगेट, मुंबई सेंट्रल, दादर, वांद्रे टर्मिनस, बोरिवली आणि मध्य रेल्वे स्थानकावरील सीएसएमटी, दादर, लोकमान्य टिळक टर्मिनस, कल्याण या स्थानकावर लांब पल्लूयांच्या गाड्या थांबा घेत असल्याने तेथे अधिक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

सर्व पोलीस ठाण्यांतर्गत पोलीस मित्र, शांतता समिती, प्रवाशांबरोबरच प्रवाशी संघटना तसेच कॅन्टीन, रेल्वे, सफाई कर्मचारी, हमाल, बुट पॉलिश वाले यांच्याशी वैयक्तिक संपर्क ठेवला जातो. त्यामुळे सुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक माहितीबरोबरच कोणतीही संशयित व्यक्ती, गोष्ट, वस्तू असल्यास त्याची तत्काळ माहिती मिळते. प्रत्येक वरिष्ठ पोलीस निरीक्षकाला किमान दोन तास क्षेत्रीय ठिकाणी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# ईव्ही वाहनांसाठी सामूहिक सुविधा केंद्रास पाच एकर जागा, उद्योजकांच्या सर्व मागण्या मुख्यमंत्र्यांकडून मान्य

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**



शेंद्रा - बिडकीन या दोन्ही औद्योगिक वसाहतींना जोडणारा वळण रस्ता, इलेक्ट्रिकल्स वाहनाला आवश्यक असणाऱ्या सामूहिक सुविधा केंद्रासाठी (ईव्ही ऑटो क्लस्टर) पाच एकराची जागा, छत्रपती संभाजीनगर शहरातून स्वतंत्र पूल आणि आंतरराष्ट्रीय प्रदर्शन सभागृहासाठी व्यवहार्यता अंतर निधीची तरतूद अशा उद्योजकांनी केलेल्या सर्व मागण्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी मान्य केल्या. शेंद्रा-बिडकीनसह औद्योगिक वसाहतींना जोडणारा वळण रस्ता झाला आहे, असा आपला समज होता. मात्र, हा रस्ता पूर्ण झाला नसेल तर तो पूर्ण केला जाईल, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्योजकांनी मांडलेल्या सर्व मागण्या मान्य केल्या. शेंद्रा औद्योगिक वसाहतीमध्ये प्रदर्शन सभागृहांची मागणी 'सीएमआयए' चे अध्यक्ष अर्पित सावे यांनी मांडली होती.. असे प्रदर्शन व परिषद सभागृह करायलाच हवे. पण असे सभागृह चालविणाऱ्या अनुभवी संस्थांशी संपर्क साधून त्याची व्यवहार्यता तपासावी लागणार आहे. जर असे प्रदर्शन किंवा परिषद सभागृह उभे केले तर त्याला लागणारा खर्च, संस्थेच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न आणि उरलेला निधी यातील व्यवहार्यता निधी (व्हायबलेटी गॅप फंडिंग) करण्यास राज्य सरकार तयार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. इलेक्ट्रिकल्स वाहन ▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांनो तुमच्या हिताचा फार्मर आयडी काढा

## सुटीच्या दिवशी रणरणत्या उन्हात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा दौरा

**बीड । प्रतिनिधी**

रविवार दिनांक २७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे , जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीकृष्ण



शिंदे यांच्यासह रखरखत्या उन्हात दौऱ्यावर निघाले . उद्देश एकच - शासनामार्फत शेतकऱ्यांच्या हितासाठी फार्मर आयडी काढून देण्याची प्रक्रिया सुरू आहे , तथापि त्यास पाहिजे तसा प्रतिसाद जिल्ह्यातून नाही म्हणून जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावा यासाठी ही धावपळ . सर्वात आधी जिल्हाधिकाऱ्यांचा ताफा पोहोचला शहरातील आयटीआय कॉलेज परिसरात . तेथे प्रस्तावित इंक्युबेशन सेंटर म्हणजेच नवीन उद्योजकांसाठी प्रशिक्षण केंद्राची जागा पाहण्यासाठी . त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी जेथे

▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्हाधिकारी पैसे घेतात, अधिकारी २% शिवाय फाइल काढत नाहीत, खासदार, आमदारांचा आरोप



**परभणी। प्रतिनिधी**

परभणी जिल्हाधिकारी पी. ए. मार्फत पैसे घेतात, असा खासदारांनी आरोप केला, तर जिल्हा नियोजन अधिकारी २ टक्के घेतल्याशिवाय एकही फाईल काढत नाहीत, असा आरोप सर्वच खासदार, आमदारांनी केल्यामुळे नियोजन अधिकारी किशोरसिंह परदेशी यांना चौकशीसाठी मुंबईत हजेरी लावण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. जिल्हा कचेरीत घेण्यात आलेल्या या आढावा बैठकीस राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार संजय जाधव, आमदार राहुल पाटील, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार राजेश विटेकर, आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, पोलिस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांची उपस्थिती होती.. पैसे कुणासाठी घेता? जिल्हा नियोजन अधिकाऱ्यावर २

▶▶ उर्वरित पान २ वर

# बंगाली बाबू फरार झाल्याची शहरात चर्चा

## तीस लाख रुपयांचा ज्वेलरी चालकाला चुना ; शहर पोलीस साधी चौकशीही करेना !

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील एका बाजारपेठेत आलिशान दुकान थाटत स्कीमच्या नावाखाली बीड जिल्ह्यातील हजारो नागरिकांना अमिषाला बळी पाडणाऱ्या बंगाली बाबू बीड मधून फरार झाल्याची चर्चा होत आहे. मागील अनेक दिवसापासून हा मंगली बापू शहरात नसून दुकानावरही येत नसल्याने त्याच्याबद्दल शहरात नागरिक चर्चा करू लागले आहेत. एका तीस लाख रुपयाच्या चेक बाउन्स प्रकरणी काही दिवसापूर्वीच शहर पोलिसांनी या बंगाली बाबूची चौकशी केली होती मात्र तो पोलिसांना गुंगारा देण्यास यशस्वी ठरला आहे. संबंधित फसवणूक प्रकरणात तडजोड करण्यासाठी ज्वेलरी चालकाला विनवण्या करण्यात आल्या मात्र बंगाली बाबुने तीस लाख रुपयांची रक्कम देणार नसल्याचे सांगितले असल्याने संबंधित ज्वेलरी चालकाने या बंगाली बाबू विरोधात शहर पोलीस ठाण्यात फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार अर्ज दाखल केला आहे. या तक्रार अर्जाची चौकशी मागील दोन महिन्यापासून शहर पोलीस करत आहे मात्र अद्यापही या बंगाली बाबुला पोलीस ठाण्यात बोलवण्यास पोलीस विभाग अपयशी ठरला आहे. शहर पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# महाराष्ट्र हादरला.! बापाने भरलग्नात मुलीवर अन् जावयावर झाडल्या गोळ्या

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्ह्यातून एक खळबळजनक घटना समोर आली आहे. जिल्ह्यातील चोपडा शहरामध्ये मुलीने दोन वर्षांपूर्वी प्रेमविवाह केल्याचा राग मनात धरून बापाने पोटच्या मुलींवर आणि जावयावर एका लग्नसोहळ्यातील हळदीच्या कार्यक्रमामध्ये धडाधड गोळ्या झाडल्या आहेत.



या घटनेत मुलीचा मृत्यू झाला आहे. तर जावई गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. तर, घटनेनंतर जमावाने केलेल्या मारहाणीत सासराही जखमी झाला आहे. ही घटना चोपडा शहरातील डॉ. आंबेडकर नगर परिसरात काल शनिवारी (दि. २६) रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. तृप्ती अविनाश वाघ (वय-२४) असं मृत विवाहितेचे नाव आहे. तर किरण अर्जुन मंगले (वय ४८, रा. शिरपूर) असं आरोपी वडिलांचं नाव आहे. याबाबत अधिक माहिती अशी कि, तृप्तीने दोन वर्षापूर्वी अविनाश ईश्वर वाघ (वय २८, दोधे रा. करवंद, शिरपूर, सध्या वास्तव्यास असलेले कोथरूड, पुणे) याच्याशी प्रेम विवाह केला होता. आरोपी वडील किरण मंगले याला हा विवाह पसंत नव्हता. बहिणीकडील विवाह समारंभासाठी अविनाश आणि तृप्ती हे शनिवारी सायंकाळी चोपडा येथे आले होते. बहिणीच्या हळदीसाठी लेक आणि जावई त्याठिकाणी आल्याची माहिती सासऱ्याला मिळाली. अविनाश याच्या बहिणीची हळद

▶▶ उर्वरित पान २ वर

# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत गरजू लाभार्थींना सेल्फ किंवा ग्रामविकास अधिकाऱ्यांमार्फत सर्व्हे पूर्ण करून घेण्याचे धनंजय मुंडे यांचे आवाहन

- परळी तालुक्यात ३१६४ सर्व्हे सह पूर्ण; २६३४ सेल्फ तर ४९९ सर्व्हे ग्रामसेवकांच्या मार्फत पूर्ण
- ३० एप्रिल आधी सर्व्हे पूर्ण करण्याचे आवाहन; कागद पत्रांची पूर्तता करण्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते करणार मदत



**परळी वै.। प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गरजू नागरिकांना घरकुलांचा लाभ मिळवून देण्यासाठी ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या मार्फत किंवा स्वतः च्या माध्यमातून सर्वे करण्याचे काम सुरू असून याची मुदत येते ३० एप्रिल रोजी संपणार असल्याने गरजू व पात्र असलेल्या लाभार्थ्यांनी घरकुलासाठी स्वतः पवरून किंवा ग्रामसेवकाच्या मार्फत आपला सर्वे पूर्ण करून घ्यावा असे आवाहन माजी मंत्री तसा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी केले आहे.

परळी तालुक्यात आतापर्यंत ३१६४ लाभार्थींचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून त्यापैकी २६३४ सर्व्हे हे नागरिकांनी स्वतः पूर्ण केले असून ४९९ सर्वे हे ग्रामसेवकांच्या मार्फत पूर्ण करण्यात आले असल्याची माहिती पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय केंद्रे यांनी दिली आहे.

दरम्यान येत्या ३० एप्रिल रोजी सर्वे पूर्ण करण्याची मुदत संपणार असून त्याआधी पात्र असलेल्या गरजू नागरिकांनी आपल्या घरकुलांचे सर्वेक्षण पूर्ण करून घ्यावे. कागद पत्रांची किंवा त्रुटींची पूर्तता करण्यासाठी परळी राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते मदत करणार असून कुणाला मदतीची आवश्यकता असल्यास त्यांनी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके यांना संपर्क करावा असे आवाहनही धनंजय मुंडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

याआधीही धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी नगर परिषदेने रमाई आवास सह विविध योजनेतून विक्रमी घरकुले मंजूर करून दिलेली आहेत.




CMYK

# परीक्षा संपल्या, आता प्रतीक्षा निकालाची

शिवप्रसाद शिरसाटं
पिंपळनेर

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात शाळांच्या वार्षिक परीक्षा शुक्रवारी (दि. २५)रोजी संपल्या. यावर्षी संपूर्ण राज्यात परीक्षा एकाचवेळी घेण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला.

दरवषीच्या तुलनेत यावर्षी उन्हाचा चटका अधिक असतानाही शिक्षण विभागाने अखेरपर्यंत आपल्या निर्णयात बदल केला नाही. परिणामी विद्याथी व पालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. पुढील शैक्षणिक वर्षात तरी शिक्षण विभागाने उन्हाळा लक्षात घेत नियोजन करावे, अशी मागणी आता होऊ लागली आहे.

दरवषी शैक्षणिक वर्षातील २२० दिवस विद्यार्थ्यांना अध्यापन होणे आवश्यक आहे. त्यात इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेचे दिवस वगळून शैक्षणिक वर्षात किमान ८०० तास, तर इयत्ता सहावीच्या पुढील वर्गातील विद्यार्थ्यांचे एक हजार तास अध्यापन बंधनकारक आहे. त्यानुसार अध्यापनाच्या तासांचे नियोजन अपेक्षित असते. या पार्श्वभूमीवर या वर्षी पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अंतिम सत्र उरकण्याची शाळांची पद्धत बंद केली. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यातून सुरू झालेली अंतिम सत्र परीक्षा २५ एप्रिलपर्यंत चालू राहिली.

या वेळापत्रकावर पालक व शिक्षकांनी आक्षेप घेतला.



विविध शिक्षक संघटनांनी यात दुरुस्ती व्हावी, अशीही मागणी केली. परंतु, शिक्षण विभाग आपल्या निर्णयावर ठाम राहिले. परिणामी ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तापमान असताना विद्याथी व पालकांना मनस्ताप सहन करावा लागला. ऐन

उन्हाळ्यात विद्यार्थ्यांना ने-आण करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. अनेक शाळांमध्ये अद्याप विजेची सुविधा नाही. वीज नसल्याने पंख्याचा विषय मात्र दूरच राहिला. जेथे वीज, पंखे उपलब्ध आहेत, तेथे भारनियमन सुरू होते. परिणामी प्रचंड उकाड्याचा सामना विद्यार्थ्यांना करावा लागला. दरवषी प्राथमिक, माध्यमिक शाळा परीक्षा एप्रिलच्या पहिल्या आठवड्यामध्ये होत असतात. १५ एप्रिलपर्यंत परीक्षांचे कामकाज पूर्ण होऊन पुढील पंधरवड्यात वार्षकि निकालपत्रिक तयार करून १ मेला निकाल जाहीर केला जातो. मात्र, यंदाचे वेळापत्रक गैरसोयीचे ठरले.

पाच दिवसांची कसोटी वार्षकि परीक्षांचा निकाल दरवषीप्रमाणे यंदाही १ मे रोजीच जाहीर होणार आहे. यंदा परीक्षा उशिराने घेण्यात आल्या. त्यामुळे वार्षिक परिक्षेनंतरची पेपर तपासणी, फेरतपासणी, संकलित मूल्यमापन नोंदवही पूर्ण करणे, निकालपत्रकांना मंजुरी घेणे, निकालपत्रक तयार करणे यासाठी शिक्षकांच्या हातात अवघे पाच दिवस शिल्लक राहिले आहेत. या पाच दिवसांत हे काम पूर्ण करण्याची कसोटी शिक्षकांपुढे आहे . जास्त विद्याथीसंख्या असणाऱ्या शाळांच्या शिक्षकांची यामुळे तारांबळ उडणार आहे.

१६ जूनला नवीन शैक्षणिक वर्ष विद्यार्थ्यांना २६ एप्रिलपासून सुटी लागली . शिक्षकांना मेच्या पहिल्या आठवड्यापर्यंत शाळेत यावे लागेल. १५ जूनला रविवार असल्याने पुढील शैक्षणिक वर्ष १६ जूनपासून सुरू होईल. पुरेशी पटसंख्या नसल्याने अतिरिक्त होण्याची टांगती तलवार शिक्षकांपुढे असते. परिणामी उन्हाळी सुटीत शिक्षकांना पटसंख्या टिकवण्यासाठी विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन शाळेत प्रवेश आणण्यासाठी प्रयत्न करावे लागतील.

पान १ वरून पुढे...

## मुंबई : रेल्वे...

पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रत्येक अधिकाऱ्याला किमान चार तास पेट्रोलिंग करणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे दैनंदिन प्रवाशांची अचानकपणे तपासणी करण्याची मोहीम सुरू असते. त्यात विशिष्ट कार्यपद्धती ठरवून देण्यात आली असून त्यानुसारच तपासणी करण्यात येते. तसेच लोकलमध्ये अचानक तपासणी म्हणजेच 'मॅसिव्ह फ्लॅश चेकिंग' करण्यात येते. त्यात एक अधिकारी व त्यांच्या सोबत तीन ते चार कर्मचारी असतात. चालू लोकलमध्ये प्रवाशांची आणि प्रवाशांसोबत असणाऱ्या सामानाची अचानकपणे तपासणी केली जाते. दैनंदिनरित्या घातपात तपासणी करण्यात येत असते. विविध पोलीस स्थानकाद्वारे या बाबींचे दैनंदिनरित्या आयुक्तालयातील 'अंतर्गत व्हाट्सअप ग्रुप मध्ये छायाचित्र प्रसारित करण्यात येतात. या छायाचित्रांचे नियंत्रण कक्षात एकत्रिकरण केले जाते. घातपात तपासणीबाबत मुंबई रेल्वे पोलीस सजग राहून कार्य करत आहे, असेही रेल्वे पोलीस आयुक्तालयाने कळविले आहे.

## ईव्ही वाहनांसाठी...

निर्मिती क्षेत्रात छत्रपती संभाजीनगर हे देशातील महत्त्वाचे ठिकाण असणार आहे. टोएटोच्या गुंतवणुकीच्या वेळी कर्नाटक सरकारने त्यांना बऱ्याच सवलती देण्याचे मान्य केले होते. मात्र, छत्रपती संभाजीनगर शहरातील औद्योगिक वातावरण आणि पायाभूत सुविधांमुळे ही गुंतवणूक महाराष्ट्रात आली. आता अशा गुंतवणुकीमुळे राज्यात औद्योगिक वाढीचे चुंबक म्हणून या शहराकडे पाहिले जात आहे. त्यामुळेच येथे आणखी आठ हजार एकर जमीन संपादन केली जाणार आहे. या पुढे 'ईव्ही' वाहन निर्मितीसाठी सामूहिक सुविधा केंद्र ऑटो क्लस्टर तयार करणे आवश्यक आहे. यासाठी तातडीने पाच एकर जागा देण्याचे निर्देश राज्य सरकारच्या वतीने दिले जातील, असेही फडणवीस म्हणाले

## शेतकऱ्यांनो तुमच्या...

शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढून देण्याचे काम सुरू आहे , अशा एक-दोन ठिकाणी घेऊन चला अशा सूचना केल्या . त्यानुसार तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वासनवाडी ग्रामपंचायत येथे ताफा वळविला . याठिकाणी वासनवाडी येथील सरपंच गणेश खोड , अशोक भाऊले , नंदकुमार खोड व गावातील नागरिक , मंडळ अधिकारी बाबासाहेब तांदळे , ग्राम महसूल अधिकारी शशांक कुलकर्णी , जगन्नाथ राऊत , शरद घोडके उपस्थित होते .

जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितांना फार्मर आयडी का काढावा याचे महत्त्व विशद करताना सांगितले की देशातील प्रत्येक नागरिकाचा वेगळा आधार आयडी आहे . त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील प्रत्येक

पान १ वरून पुढे...

शेतकऱ्याचा एक युनिक फार्मर आयडी तयार केलं जाणार आहे . केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांच्या यूनिक फार्मर आयडी आणि त्यांच्या जमीन रेकॉर्डला जोडण्याची ( लिंक करण्याची ) मोहीम सुरू आहे . सध्या त्यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर राज्यात गाव पातळीवर विशेष कॅम्प आयोजित करून एक कोटी पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे युनिक फार्मर आयडी तयार केले जाणार आहेत . विशेष बाब म्हणजे भविष्यात शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ याच युनिक फार्मर आयडी च्या माध्यमातून मिळणार आहे . तसेच जमिनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार करण्यासाठी ही भविष्यात हे युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे . त्यामुळे महसूल , कृषी आणि ग्रामविकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने शेतकऱ्यांनी युनिक फार्मर आयडी तयार करून घेणे महत्वाचे ठरणार आहे . ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत तयार होणारे युनिक फार्मर आयडी भविष्यात शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे . पीएम किसान सन्मान योजनेचे अनुदान मिळविणे , किसान क्रेडिट कार्ड बनविणे , पीक विमा काढणे , त्या अंतर्गत परतावा मिळविणे यासाठी युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल . शिवाय सरकारने जाहीर केलेली पिकांची नुकसान भरपाई मिळविणे , पीक व शेती विषयक सर्वेक्षण करून घेणे , शेतमालाची एमएसपीच्या दराने विक्री करणे , कृषी विभागाच्या विविध योजना अंतर्गत कृषी निविष्ठा व इतर सेवांचा लाभ मिळविणे , बाजारपेठेची माहिती , कृषी विषयक कामासंदर्भात कृषी तज्ञांचे मार्गदर्शन मिळविणे यासाठी युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरणार आहे . शेत जमिनीच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारासाठी हे युनिक फार्मर आयडी आवश्यक ठरेल .एवढंच नाही तर सरकारलाही या युनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून कोणत्या शेतकऱ्याची कुठे किती जमीन आहे . कोणता शेतकरी कोणकोणत्या योजनांचा लाभ घेत आहे हे सर्व एका क्लिकवर माहीत होणार आहे . या युनिक फार्मर आयडीच्या माध्यमातून सरकारला चालू हंगामात राज्यातील किती शेतकऱ्यांनी कोणते पीक घेतले आहे , याची माहिती एका क्लिक वर मिळेल . यासाठी सर्व शेतकरी बंधू आणि भगिनींनी युनिक फार्मर आयडी काढून घ्यावा , असेही जिल्हाधिकारी यांनी आवाहन केले . यावेळी वासनवाडी येथील शेतकरी मदन घाटे यांना तात्काळ समोरासमोर फार्मर आयडी काढून दिला .

त्यानंतर प्रस्तावित विमानतळाची जागा बघण्याचा मानस जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केला . त्यानुसार कामखेडा येथील सुमारे साडेतीन किलोमीटर लांबीची व ३५० मीटर रुंदीच्या प्रस्तावित धावपट्टीची व परिसराची पाहणी जिल्हाधिकाऱ्यांनी केली . यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीकृष्ण शिंदे , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी माहिती दिली . तहसीलदार चंद्रकांत शेळके , मंडळ अधिकारी अंगद काशीद यांनी नकाशा आधारे प्रस्तावित विमानतळाच्या हद्दी खुणा , कोणते गट समाविष्ट होतील

पान १ वरून पुढे...

यासंदर्भात सविस्तर माहिती सांगितली . यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कामखेडा येथील सी एस सी केंद्राला भेट दिली . यावेळी सरपंच बिलाल पटेल , सचिन जमदाडे , गजानन फाटे , सय्यद मोहम्मद सय्यद उस्मान , गणेश नेवडे , अरुण पवार , परमेश्वर पवार , रज्जाक शेख , प्रकाश वाघमारे , अब्दुल रहीम उस्मान शेख , सलीम शेख , मंडळ अधिकारी अंगद काशिद , अनिल तांदळे , ग्राम महसूल अधिकारी शरद घोडके , कृष्ण रत्नपारखे , गणेश गायकवाड , विकास ससाणे , आप्पासाहेब पवार उपस्थित होते . यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रीस्टॅक प्रकल्पातर्गत फार्मर आयडी काढण्याचे काय महत्त्व आहे , याबद्दल सविस्तर माहिती दिली . तसेच सय्यद मोहम्मद सय्यद उस्मान या शेतकऱ्याचा फार्मर आयडी समोर काढून घेतला . गावकऱ्यांनीही जिल्हाधिकाऱ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधला .

रखरखत्या उन्हात , सुट्टीच्या दिवशी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पाहणी दौरा केला . शेतकऱ्यांशी चर्चा केली , त्यांच्या समस्या जाणून घेतल्या . फार्मर आयडी काढण्यासाठी तळमळ व्यक्त केली . त्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केल्या जात आहे .

जिल्ह्यात सर्वत्र उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , मंडळ अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्यामार्फत तसेच गटविकास अधिकारी , ग्रामसेवक , तालुका कृषी अधिकारी , कृषी सहाय्यक यांच्यामार्फत फार्मर आयडी काढून देण्याचे काम वेगाने सुरू आहे . नागरिकांनी सुद्धा स्थानिक तलाठी , ग्रामसेवक , कृषी सहाय्यक यांच्याशी संपर्क साधून पुढील दोन दिवसात शंभर टक्के फार्मर आयडी ग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत काढून घ्यावेत , असे आवाहन यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले .

## जिल्हाधिकारी पैसे...

टक्के घेतल्याचा आरोप झाल्यानंतर हा माझाच विभाग आहे, हे पैसे तुम्ही कुणासाठी घेता अन् कुणाला देता ?

असा सवाल पवार यांनी केला, सोमवारी सुनावणीसाठी मंत्रालयात भेटा, असा इशारा दिला.

बैठकीच्या सुरुवातीलाच पवार यांनी परिसरातील अस्वच्छता पाहून जिल्हाधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. परिसर आणि तुमचा चेहरा पाहूनच सगळे कळते, असे वक्तव्य त्यांनी केले.

माहिती नसल्याने संताप

निराधारांच्या प्रश्नावर निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे योग्य माहिती नसल्यानेही पवार यांनी संताप व्यक्त केला, या विभागाच्या प्रधान सचिवांनाच थेट फोन केला. डीबीटीद्वारे निराधारांना पगार वाटप होण्यासाठी केवायसी केली नसल्याने हे दुर्दैवी असल्याचे ते म्हणाले.

आता टंचाईत भरपूर निधी आहे. मागणी करा, अडचण येणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली, तर शिव व पाणंद रस्ते मागणीप्रमाणे

पान १ वरून पुढे...

मंजूर करून त्याचे योग्य नियोजन करण्यासही बजावले.

## बंगाली बाबू...

ठाण्याचा कारभार सिंघम ख्याती असलेले शितल कुमार बल्लाळ यांच्या हातात आहे या बंगाली बाबू ची चौकशी न झाल्याने शहर पोलीस ठाण्याच्या कारभाराविषयी बीड शहरातील नागरिकांना संशय निर्माण होत आहे.

स्कीमच्या माध्यमातून लोकांना बुलेट व चार चाकी वाहनांचे अमित दाखवत हवा करणाऱ्या बंगाली बाबूची हवा निघून गेली आहे का. मागील अनेक दिवसापासून स्कीमच्या नावाखाली लोकांकडून पैसा गोळा करण्याचे काम या बंगाली बाबू कडून होत आहे मात्र मध्यंतरी एका ज्वेलरी चालकाने या बंगाली बाबूच्या विरोधात तीस लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनंतर बंगाली बाबू बीड शहरातून बेपत्ता झाला आहे मागील अनेक दिवसांपासून तो शहरात दिसत नसल्याने त्यांनी काढलेल्या स्कीम व त्याच्या विषयी शंका निर्माण होत आहे बीड शहर सोडून पळून गेल्याची चर्चा शहरातील नागरिकात होत असून या बंगाली बाबू ने कोणाला किती चुना लावला याबाबत आता चर्चा सुरू झाली आहे. शहरात संस्था व व्यक्तींनी वैयक्तिक स्वार्थापोटी बीड शहरातील नागरिकांना आर्थिक संकटात टाकलेले आहे पूर्वीचा अनुभव पाहता बीड शहरातील सुजाण नागरिक या बंगाली बाबूच्या कचऱ्यात सापडून यासाठी ही जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. चांगले काम करणाऱ्याच्या नेहमीच पाठीशी तर लोकांची फसवणूक करण्याच्या इरादा ठेवणाऱ्यांच्या मुळावर घाव घालण्याचे काम करत असून या बंगाली बाबूच्या विरोधात कोणाला काहीही माहिती असल्यास तत्काळ मराठवाडा पत्रला याची माहिती द्यावी.

## महाराष्ट्र हादरला....

शनिवारी (दि. २६) चोपडा शहरातील खाईवाडा जवळील आंबेडकरनगर येथे होती. त्या निमित्ताने ते चोपडा येथे आले होते. त्यात तृप्तीने प्रेम विवाह केल्याचा राग वडील निवृत्त सीआरपीएफ किरण मंगले यांच्या मनात होता. हळद सुरू असलेल्या ठिकाणी जाऊन त्यांनी मुलगी तृप्ती वाघ हिच्यावर आणि तिचा पती अविनाश वाघ यांच्यावर गोळीबार केला. या घटनेत मुलगी तृप्तीचा मृत्यू झाला. तर जावई अविनाश याला पाठीत व हाताला गोळी लागल्याने गंभीर जखमी झाला आहे...

दरम्यान, अविनाशची प्रकृती गंभीर असल्याने त्याला जळगाव येथील रुग्णालयात उपचारांसाठी हलवण्यात आले आहे. या घटनेनंतर नातेवाईकांनी तिच्या वडिलाला मारहाण केली. या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधीक्षक महेश्वर रेही यांनी चोपड्यात जाऊन घटनेची माहिती घेतली.

पान ४ वरून पुढे...

## पिकअप कारची...

झालेल्या अपगातात पीकअपचे चालकाच्या बाजूचे टायर तुटून पडले. कारमधून प्रवास करणारे चौघे व पीकअपमधील दोन महिला व दोन मुले असे एकूण आठजण जखमी झाले आहेत. त्यापैकी आवेज सुभान गवळी यांच्या हाताला व चेहऱ्याला तर जिजाबाई व्यंकट कानगुटे यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने ते दोघे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच अलिफ शेख, महम्मद साबेर शेख, अझर शेख व शोभा कानगुटे यांच्यासह दोन मुले असे एकूण आठजण जखमी आहेत. जखमी रुग्णांना केज येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यानंतर ४ गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वराती रुग्णालयात पाठविण्यात आल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ दत्तात्रय केंद्रे यांनी लोकमतशी बोलताना दिली. या अपघाताची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक वैभव पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे यांनी पोलीस कर्मचाऱ्या सह घटनास्थळी भेट देवून जखमीना केजच्या उपजिल्हा रुग्णालयात पाठविले.

## न्यायालयाच्या आदेशानंतरही...

मंत्री नितीन गडकरी यांनी महाराष्ट्र राज्य महामार्ग प्राधिकरण

पान ४ वरून पुढे...

विभागाला विशेष लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या सुचना दिल्या होत्या. तसेच याबाबत दिलीप सुलाखे यांनी न्यायालयात देखील याचिका दाखल केली होती. न्यायालयाने देखील तांदळा येथील शेतकऱ्यांच्या जमिनीतून अनाधिकृत महामार्ग झाल्याचे नोंदवून संबंधितांना भूसंपादन करुन मावेजा देण्याचे आदेश दिले होते. यानंतर संबंधित शेतकऱ्यांनी न्यायालयाच्या आदेशानुसार भुमीअभिलेख कार्यालयात रितसर मोजणी फी भरुन मोजणी केली. मात्र यानंतर प्रशासकीय पातळीवर याप्रकरणी उदासीनता दिसून येत आहे. अनाधिकृत महामार्गात सन १९६१ पासून जमीनी गेलेल्या असताना, तसेच न्यायालयाचे आदेश असताना देखील मावेजासाठी कारवाई होत नसल्याने तांदळा येथील संबंधित शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे. दरम्यान न्याय मिळत नसल्याने या शेतकऱ्यांनी आता १ मे महाराष्ट्र दिनी सामुहिक आत्मदहन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, जिल्हाधिकारी तसेच महामार्ग प्राधिकरण विभागाला दिले आहे.

## 'अंगाला हळद...

संघर्ष करण्याची आणि योग्य पद्धतीने जीवनाला आकार देण्याची प्रेरणा मिळाली.कोमलचं यश फक्त तिच्या कुटुंबाचं नाही, तर संपूर्ण गावाचं आहे. तिच्या यशाचा उत्सव गावात मोठ्या उत्साहाने साजरा

पान ४ वरून पुढे...

केला गेला. जीप मिरवणूक, टाळ्यांचा गजर, आणि गावकऱ्यांचा अभिमान – या सगळ्याचं एकच कारण होतं, कोमलचं अथक परिश्रम आणि त्यावर मिळालेलं यश.कोमल म्हणते, स्वप्नं पाहणं, त्यांचं ध्येय ठरवणं आणि त्यासाठी मेहनत करणं, हेच यशाचं गमक आहे. आणि भावाच्या शब्दांनी मला नेहमीच हे शिकवलं की, 'यश मिळवण्यासाठी मेहनत हीच खरी हळद आहे आणि कर्तृत्वाचा गुलाल चांगला!'कोमलच्या यशाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे – संघर्ष, धैर्य आणि कष्ट हेच यशाचे खरे शस्त्र आहेत.आज कोमलच्या यशाने साऱ्यांना हे सांगितलं की, संघर्षाचा मार्ग लांब असला तरी, कर्तृत्वाच्या मदतीने प्रत्येक युवक, प्रत्येक मुलगी, स्वप्नं पूर्ण करू शकते!

## दैनिकाचे उपकार...

साधत त्यांची व्यथा विविध दैनिकात प्रसिद्ध केली.दैनिकातील बातमींची महावितरणच्या वरीष्ठ आधिका-यांनी दखल घेत अभियंता शिंदे यांची कान उघडणी केल्यानंतर शिंदे यांनी सरपंच विश्वंभर गिरी व शेतकऱ्यांशी संवाद साधत आज दुपारी जळालेले केबल बदलून दिले. वीजपुरवठा सुरळीत झाल्याने जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला असुन सरपंच विश्वंभर गिरी, शेतकरी अभिमान सुरवसे, युवराज सुरवसे यांनी प्रसारमाध्यमांचे आभार मानत कृतज्ञता व्यक्त केली.

पान ४ वरून पुढे...

## कत्तलीसाठी जनावरांना...

सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांनी दिली. सविस्तर वृत्त असे की केशव रत्नपारखे यांच्या फिर्यादीवरून पाडळसिंगी टोलनाक्याजवळ आयशर टेम्पो क्रमांक एम. एच .१६-ध- ९५०३ क्रमांकाच्या टेम्पोमध्ये भल्या पहाटे तीनच्या दरम्यान विनापरवाना अवैधरीत्या जनावरे भरून ते विक्री करण्यासाठी छत्रपती संभाजी नगर येथे घेऊन जात आहेत अशी माहिती मिळाली सदरील या प्रकरणी गोरक्षकांनी गेवराई पोलीस स्टेशनला कळवले. पोलीस प्रशासनाने आयशर चालक काझी मोहसीन काझी खुर्चीद अहमद वय ४० राहणार नेकनूर त्यांच्यासोबत असणारे किन्नर जावेद महबूब कुरेशी आहे सदरील टेम्पोला असलेली ताडपत्री प्रशासनाने चालकाला काढायला लावली त्यात एक म्हैस मृत्युमुखी पडली होती आणि आयशर टेम्पोमध्ये मागील बाजूच्या शिंगी असलेल्या काळया रंगाच्या १४ म्हैशी जातीच्या त्यांना कोठल्याही चारा व पाणी ठेवला नसल्यानें तसेच त्यांच्या काळजीची व्यवस्था न केल्याने या कोंबून आणलेल्या जनावराचे वैद्यकीय तपासणीचे प्रमाणपत्र, वाहतूक परवाना, चारा पाण्याच्या व्यवस्थेबाबत पोलीस प्रशासनाने विचारले असता मझ्याकडे कुठल्याही प्रकारची कागदपत्रे नाही तसेच चारा पाण्याची व्यवस्था केली नसल्याचे स्पष्ट आरोपींनी सांगितले. सदरील जनावरांना निर्दयतेने कोंबून आणल्यामुळे व तसेच आयशर मध्ये क्रूरपणे भरून आणल्यामुळे दिसुन आले. पुढील तपास शिवाजी भुतेकर साहेब करत आहेत

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# समता परिषदेच्या वतीने आयोजित फुले दांपत्याच्या जीवनावर आधारित 'फुले' चित्रपटाचा शो हाउसफुल

माजलगाव । प्रतिनिधी

हजारो वर्षांच्या मानसिक गुलामगिरीतुन मानवतेला बाहेर काढणाऱ्या क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व महिला मुलींमध्ये शिक्षणाची ज्ञानगंगा पसरविणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जिवनावर आधारित हिंदी चित्रपट 'फुले' आज रविवार दि. २७ एप्रिल २०२५ रोजी अखिल भारतीय महात्मा फ ुले समता परिषद बीड जिल्हा यांच्यावतीने समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगनरावजी भुजबळ साहेब, माजी खासदार समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. हा चित्रपट आज हाउसफुल झाला असून प्रेक्षकांची प्रचंड गर्दी निर्माण झाली होती. अखेर शेवटी चित्रपटाचा पुढील शो करिता तिकिटाची बुकिंग आज तनिष्क सिनेप्लेक्स या चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या वतीने करण्यात आली.

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाषभाऊ राऊत यांनी चित्रपटाचा पहिला शो पाहिल्यानंतर बीड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे विचार प्रसारित व्हावेत याकरिता रविवार दि. २७ एप्रिल २०२५ रोजीचा दुपारी तीन वाजताचा शो तनिष्क सिनेफ्लेक्स येथे फुले प्रेमी नागरिकांसाठी



आयोजित केला होता. घरातली स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब ती शिकवू शकते या विचारांची कास धरून क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी सर्वप्रथम आपली पत्नी क्रांतीज्योती, ज्ञानगंगा सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करण्याचे ठरवून त्यांना प्राथमिक शिक्षण दिले. याबरोबरच त्यांना प्रथम महिला शिक्षिका करण्यासाठी शिक्षण द्यावयाचे ठरविले. यावेळी फातिमा शेख यांनी सुद्धा शिक्षिका बनण्याचे ठरविले. त्यांच्या या स्वप्नांना त्यांचे बंधू उस्मान शेख यांनी भरघोस पाठिंबा देऊन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यासोबत शिक्षिका बनवण्याचे शिक्षण घेण्यास पाठविले. सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख या शिक्षिका झाल्याच्या नंतर त्यांनी पहिली महिला मुलींसाठी शाळा सुरू केली. ही शाळा उभारण्यासाठी तत्कालीन

### पहलगाम येथे मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना श्रद्धांजली

बीड येथील तनिष्क सिनेप्लेक्स या चित्रपटगृहात 'फुले' चित्रपट सुरू होण्यापूर्वी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. याबरोबरच काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सिनेफ्लेक्स मधील वातावरण भावनिक झाले होते.

ब्राह्मण समाजातील तात्या भिडे आणि अन्य समाज बांधवांनी त्यांना प्रोत्साहन दिले. उस्ताद लहुजी साळवे यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी उराशी बाळगलेल्या स्वप्नांना पूर्ण करण्यासाठी आपली संपूर्ण ताकद लावली. असा इत्यंभूत इतिहास मांडलेला 'फुले' चित्रपट नागरिकांच्या पसंतीस पात्र ठरत असून आजचा झालेल्या हाउसफुल शो पाण्यासाठी बाल गोपाळांसह महिला आणि पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. चित्रपटगृहाची बसण्याची क्षमता संपल्यानंतर उर्वरित प्रेक्षकांसाठी पुढील शोची तिकिटे वितरित करण्यात आली. बहुजन समाजाने सदरील चित्रपट पाहून त्या काळाच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि क्रांतीज्योती, ज्ञानगंगा सावित्रीबाई फुले यांनी किती संघर्षातून शिक्षणाची ज्योत सर्वसामान्यांमध्ये पसरविली याचे आकलन नक्कीच होते. याकरिता बहुजन समाजातील नागरिकांनी एकदा फुले दांपत्याच्या जीवनावर आधारित 'फुले' चित्रपट नक्कीच पहावा असे आवाहन याप्रसंगी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत यांच्यासह शहराध्यक्ष निखील शिंदे, नितीन राऊत, धनंजय काळे यांनी केले आहे.

## महाहौसिंगने परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीचा वेग वाढवावा – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ म्हणजेच महाहौसिंगने प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या बांधकामांना गती देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत. त्यांना येणाऱ्या अडचणींवर शासनाच्या स्तरावरून प्राधान्याने निश्चितपणे मार्ग काढला जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. काल सह्याद्री अतिथीगृह येथे महामंडळाच्या कामाचा आढावा उपमुख्यमंत्र्यांनी घेतला. यावेळी गृहनिर्माण राज्यमंत्री तथा महामंडळाचे सहअध्यक्ष डॉ. पंकज भोयर उपस्थित होते.



प्रारंभी महामंडळातर्फे सहसचिव विवेक दहिफळे यांनी सादरीकरण केले. प्रधानमंत्री आवास योजनेत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक अल्प व मध्य उत्पन्न घटक यांच्यासाठी शासकीय जमिनीवर किंवा खासगी जमीन मालकासोबत संयुक्त भागीदारी तत्त्वावर परवडणाऱ्या घरांचे घर निर्माण प्रकल्प महामंडळामार्फत राबविण्यात येतात. या म हामंडळासाठी ६०० कोटी रुपये भाग भांडवल मिळाले आहे. म हाहौसिंगमार्फत आतापर्यंत बाराम ती येथील आंबेडकर वसाहत हा प्रकल्प पूर्ण झाला आहे आणि सोलापूर, नागपूर या भागात सात गृहनिर्माण प्रकल्प सुरू आहेत. यातून २१ हजार ३५ सदनिका उपलब्ध होणार आहेत. यासाठी केंद्राकडून अनुदानाचा पहिला हप्ता म्हणून १०८ कोटी ५९ लाख रुपये मिळाले असून ६८ कोटी ५४ लाख रुपये राज्य शासनाचा हप्ताही प्राप्त झाला आहे. याशिवाय टिटवाळा, खंडाळा या ठिकाणी दोन नियोजित प्रकल्प देखील आहेत. बांधण्यात आलेल्या घरांची विक्री बुक माय होम्स मार्फत केली जाते. साधारणपणे १५ लाखापर्यंत एका सदनिकेची विक्री किंमत येते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल लाभार्थींना सुलभ गृह कर्ज सुद्धा उपलब्ध करून देण्यासाठी बिगर बँकिंग वित्तीय संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. या प्रकल्पांना सध्या काही आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. प्रकल्पांमध्ये डीपी रस्त्याचे काम करणे, सांडपाणी व पावसाळी पाणी निचरा करणे, वीज पुरवठा करणे, पाणीपुरवठा करणे या बाबींसाठी महाहौसिंगच्या स्तरावरून पाठपुरावा करण्यात येत आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासंदर्भामध्ये तातडीने विविध महापालिका आयुक्त त्याचप्रमाणे महावितरण व संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात येऊन या अडचणी सोडवण्यात येतील असे सांगितले. गरीब आणि सर्वसामान्यांसाठी अधिकाधिक घरे परवडणाऱ्या दरामध्ये उपलब्ध होणे गरजेचे आहे. महाहौसिंगसारख्या महामंडळाने आपल्या कामाला अधिक चांगल्या पद्धतीने गती देऊन जास्तीत जास्त प्रमाणात गृहनिम ाण करणे आवश्यक आहे.

## रुग्णांचे आई-वडिल होऊन सेवा करा- डॉ. आदिती सारडा

### आदित्य नर्सिंग महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ उत्साहात

बीड । प्रतिनिधी

आई-वडील जसे आपल्या लेकरावर जीव लावतात तसाच जीव आपण रुग्णसेवा करताना आपल्याकडे आलेल्या रुग्णा प्रति दाखवावा. जेणेकरून रुग्णाची केलेली सेवा हीच ईश्वराची सेवा ठरेल. आदित्य नर्सिंग महाविद्यालयामधील पहिली विद्यार्थ्यांची बॅच बाहेर पडताना एका डोळ्यामध्ये अश्रू तर दुसऱ्या डोळ्यांमध्ये आनंद आहे. उद्या माझे विद्यार्थी रुग्ण सेवेचे दायित्व यशस्वीपणे पार पाडतील यामध्ये कोणतीही शंका नाही. असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले. बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य नर्सिंग महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून



संचालिका डॉ. आदिती सारडा या बोलत होत्या. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांची होती. व्यासपीठावर डॉ. आदिती सारडा, प्राचार्य प्रा. विकास गर्जे यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. आदिती सारडा म्हणाल्या की, आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात आहेत. देशासह परदेशातही मोठ-मोठ्या पदावर आज आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी कार्यरत आहेत. याचा अभिमान वाटतो. आज तुम्ही नर्सिंगचे शिक्षण पूर्ण करून रुग्ण सेवेचे दायित्व यशस्वीपणे पार पाडा. तुमच्या यशावरच आदित्य शिक्षण संस्थेचे नाव देशासह परदेशात अभिमानाने घेतले जात असल्याचे डॉ. आदिती सारडा यावेळी म्हणाल्या. यावेळी पठाण अक्यूब ह्या विद्यार्थ्याने आपला महाविद्यालयातील प्रवास सांगितला. कशाप्रकारे महाविद्यालय व संस्था नेहमी त्याच्या पाठीशी उभी होती हे त्याने आपल्या शब्दातून सांगितले. हा कार्यक्रम संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, आदित्य नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य विकास गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. प्रा. धीरज कुमार बारगजे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी मुलांना भविष्यात कशाप्रकारे तुम्ही आधी परिचारिका म्हणून काम करू शकता व रुग्णसेवा पुरवू शकता याबद्दल मार्गदर्शन केले.र्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्योती मस्के यांनी तर आभार प्रा. गाडे यांनी मानले. कार्यक्रमाला प्रा. रागिनी देवकर, प्रा. प्रा. सय्यद महरीन, प्रा. शेख म हेर यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदित्य नर्सिंग कॉलेजचे पाचव्या सत्रातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम दशकपूर्तीनिमित्त आज मुंबईत सोहळा




मुंबई । प्रतिनिधी

सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय नावीन्यता, उत्कृष्टता व सुशासन) व महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची 'दशकपूर्ती आणि प्रथम सेवा हक्क दिना' निमित्त राज्यस्तरीय सोहळा उद्या सोमवार २८ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

सह्याद्री अतिथीगृह येथे दुपारी १ वा. होणाऱ्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार व मुख्य सचिव सुजाता सौनिक उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव यांनी दिली आहे.

महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसूचित सेवा पारदर्शक, गतिमान व विहित कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ पारित करण्यात आला आहे. नागरिकांना सुलभ व कालमर्यादेत सेवा मिळाव्यात हे या अधिनियमाचे उद्दिष्ट आहे.

# महाराष्ट्रात एप्रिलमध्येच जनतेच्या घशाला कोरड, कोणत्या जिल्ह्यात किती पाणीसाठा? ऐकून बसेल धक्का!

मुंबई । प्रतिनिधी

यंदा एप्रिल महिन्यातच महाराष्ट्रात पाणीसंकट निर्माण झालंय. राज्यातील धरणांमधील पाणीसाठा ३८ टक्क्यांवर आलाय. अजून उन्हाला संपायला अनेक दिवस बाकी आहेत. त्याआधीच पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत असल्याने सर्वांचीच चिंता वाढलीये.

महाराष्ट्रावरील पाणीसंकट दिवसेंदिवस आणखीनच गडद होत चाललंय. जागतिक तापमानवाढीमुळे सर्वो त मोठा फटका पाणीसाठ्याला बसतोय. उन्हामुळे बाष्पीभवन आणि वाढत्या मागणीमुळे पाणीसाठी दिवसेंदिवस कमी होत चाललाय. गेल्यावर्षी सरासरीहून अधिक पाऊस होऊनही यंदा मात्र एप्रिल महिन्यातच जनतेच्या घशाला कोरड पडलीये. राज्यात एकूण २ हजार ९९७ धरणं आहेत. त्यांची एकत्रित साठवण क्षम ता ४० हजार ४९८ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. या घडीला या धरणांमध्ये केवळ ३८ टक्के पाणीसाठी शिल्लक आहे. गेल्या १५ दिवसांत जलसाठ्यात ५ टक्क्यांनी घट झालीये. विदर्भ आणि मराठवाड्यात तर अत्यंत विदारक परिस्थिती निर्माण झालीये.

कोकणामध्ये ४४.३७ %, पुण्यामध्ये ३०%, नाशिकमध्ये ४०%, मराठवाड्याम ध्ये ३५.८२%, अमरावतीमध्ये ४६%, नागपूरमध्ये ३७.५५% पाणीसाठी शिल्लक आहे. पुणे विभागात सर्वात कमी म्हणजेच केवळ ३० टक्के पाणीसाठा आहे. सध्या राज्यातील १७ जिल्ह्यांमधील ४४७ गावं आणि १३२७ पाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. या टँकरच्या मागणीतही वाढ होतेय. अनेक भागांमध्ये घोटभर पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागतेय. तहान भागवण्यासोबतच शेती जगवण्याचंही मोठं आव्हान शेतक-यांसमोर उभं ठाकलंय.

धरणांमधील पाणीसाठ्याचं योग्य नियोजन न झाल्याने एप्रिल महिन्यातच जलसाठा आटल्याचा आरोप होतोय. मात्र पाण्याचं नियोजन करण्यात आल्याचं राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितलंय.

## कबड्डीच्या सामन्यावरून उफाळला वाद, नाशिकमध्ये विद्यार्थिनींचा जोरदार राडा, शाळेबाहेरच फ्री स्टाईल हाणामारी

नाशिक । प्रतिनिधी

चौकाचौकात युवक आणि तरुणांम ध्ये हाणामाऱ्यांचे प्रकार नित्याचेच झाले आहेत. मात्र, सिडको परिसरातील पवननगर येथे कबड्डी स्पर्धेनंतर शालेय विद्यार्थिनींमध्ये फ्री स्टाईल हाणामारी झाल्याची घटना घडली. या घटनेची नाशिक शहरात जोरदार चर्चा रंगली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, शुक्रवारी (दि. २६) दुपारी साडेबाराच्या सुमारास पवननगर येथील एका शाळेजवळ आठ ते दहा विद्यार्थिनी जात होत्या. याच दरम्यान, कबड्डी स्पर्धे त एका संघाने विजय मिळविल्याचा राग मनात धरून दुसऱ्या गटातील एका विद्यार्थिनीने त्या गटातील विद्यार्थिनीला थांबवून मारहाण करण्यास सुरुवात केली.

दोन्ही गटातील विद्यार्थिनी आक्रमक- स्थानिक नागरिकांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला, परंतु दोन्ही गटातील विद्यार्थिनी अत्यंत आक्रमक झाल्या होत्या. सुमारे चार ते पाच मिनिटे ही हाणामारी सुरू राहिल्याने बघ्यांची म ोठी गर्दी झाली होती. काहींनी या घटनेचा व्हिडीओ काढून सोशल मीडियावर टाकल्याने या प्रकाराची नाशिकमध्ये जोरदार चर्चा रंगली आहे.



CMYK

दैनिक **मराठवाडा पत्र**

● epaper.marathwadapatra.com

सोमवार, दि.२८ एप्रील २०२५ पान ४

## पिकअप कारची धडक, ८ जखमी; उमरी टोलनाक्या जवळ अपघात



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील उमरी शिवारातील टोलनाक्या जवळ रविवारी सकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान पिकअप व कार यांच्यात समोरासमोर जोराची धडक होऊन झालेल्या अपघात आठ जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. अपघातात गंभीर जखमी झालेल्या आठ जणांमध्ये चार पुरूष, दोन महिला व एका बालकांचा समावेश आहे. केज बीड राष्ट्रीय महामार्गांवर उमरी शिवारातील टोलनाक्या जवळ स्विफ्ट कार (एमएच-१४/एफसी-२०३८) ही अंबाजोगाईहून बीडच्या दिशेने भरधाव वेगात जात आसताना पुण्याहून नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील आपल्या गावाकडे जात असलेल्या पिकअप (एमएच-१४/एचयु-७१४२ ) यांची समोरासमोर धडक होऊन ▶▶ उर्वरित पान २ वर

# न्यायालयाच्या आदेशानंतरही शेतकऱ्यांना मिळेना न्याय!

- भूसंपादन न करताच शेतकऱ्यांच्या शेतातून महामार्गाची झाली निर्मिती
- तांदळा येथील संतप्त शेतकरी १ मे महाराष्ट्रदिनी करणार सामुहिक आत्मदहन

**गेवराई । प्रतिनिधी**

जुना रस्ता वेगळ्या ठिकाणाहून असताना कल्याण-विशाखापट्टणम या महामार्गाची गेवराई तालुक्यातील तांदळा याठिकाणी दुसरीकडूनच शेतकऱ्यांच्या शेतात निर्मिती करण्यात आली. यावेळी संबंधित विभागाकडून शेतकऱ्यांच्या जमिनीचे कोणतेही भूसंपादन करण्यात आलेले नाही, तसेच मावेजा देखील शेतकऱ्यांना मिळालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीतून अनाधिकृत हा महामार्ग गेला आहे. याबाबत तांदळा येथील शेतकऱ्यांचा मागील आठ वर्षापासून न्यायालयीन लढा सुरु असून याप्रकरणी न्यायालयाच्या देखील संबंधित विभागाला महामार्ग गेलेल्या जमीनीचे भूसंपादन करुन संबंधित शेतकऱ्यांना मावेजा करण्याचे आदेश दिलेले आहेत. तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी देखील महामार्ग प्राधिकरण विभागाला कारवाईबाबत सूचना दिलेल्या आहेत. तरी देखील याप्रकरणी कोणतीही कारवाई होत नसल्याने तांदळा येथील शेतकऱ्यांनी १ मे महाराष्ट्रदिनी सामुहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

गेवराई तालुक्यातून कल्याण-विशाखापट्टणम हा राष्ट्रीय महामार्ग क्र.२२२ गेलेला आहे. दरम्यान तालुक्यातील तांदळा याठिकाणी हा महामार्ग सन १९६१ साली वेगळ्या ठिकाणी असताना तो दुसरीकडून करण्यात आला. याबाबत शिर्डी गावचे भुमिपूत्र तथा शिर्डी संस्थानचे पुजारी दिलीप सुलाखे शास्त्री यांनी आठ वर्षापूर्वी कागदपत्रांसह हा प्रकार समोर आणून सदरील महामार्ग तांदळा याठिकाणी अनाधिकृत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. यासाठी त्यांनी ज्या शेतकऱ्यांच्या जमीन या महामार्गात गेल्या आहेत त्यांना सोबत घेऊन वेळोवेळी आंदोलने केली. तसेच तहसीलदार, जिल्हाधिकारी, महामार्ग प्राधिकरण, विभागीय आयुक्त तसेच केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची वेळोवेळी भेट घेऊन अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत मागणी केली. यानंतर ▶▶ उर्वरित पान २ वर



## पहाडी पारगाव येथील, श्री.संकटमोचन दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या भव्य शिखरावर कळश स्थापना

**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील, ग्रामदैवत श्री.संकटमोचन दक्षिणमुखी हनुमान मंदिराच जीर्णोद्धार ग्राम स्थांच्या लोकवर्गणीतून करण्यात आला आहे या मंदिरावरील कळशारोहनानिमित्त भव्य शिवम हापुराण कथा व अखंड नामजप सप्ताहाचे आयोजन शनिवार दि.१९ एप्रिल २०२५ ते २६ एप्रिल २०२५ शनिवार यादरम्यान मंदिराच्या प्रारंगणात करण्यात आले होते. याबाबत अधिक माहिती अशी की, श्री.संकट मोचन दक्षिणमुखी हनुमान मंदिराच जीर्णोद्धार करण्यात आलेला आहे मंदिरावरील कळशारोहना निमित्त भव्य शिव महापुराण कथा व अखंड नामजप सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

पहाडी पारगाव येथील दत्त मंदिर संस्थानचे ह.भ.प.श्री. गुरुवर्य अरविंद बाबा गिरी महाराज यांच्या अमृततुल्य वाणीतून शिवमहापुराण कथा संपन्न झाली.डॉ.अक्षय मुंडे शिवमहापुराण कथे दरम्यान आले असता त्यांची आयपीएस पदी निवड झाल्याबद्दल अरविंद बाबानी त्यांना आशीर्वाद दिला. चैत्र कृ.११ दि.२४ एप्रिल २०२५ गुरुवार रोजी सकाळी ८:०० वाजता कळशाची भव्य मिरवणूक गावामधून काढण्यात आली. गुरुवर्य ह.भ.प.वसंत महाराज पिंपळनेरकर, ह.भ.प.शांतिब्रह्म श्री.नवनाथ महाराज, ह.भ.प.श्री. अर्जुन महाराज लाड, ह.भ.प. शांतिब्रह्म श्री.पांडुरंग महाराज मुंडे, ह.भ.प.श्री.नवनाथ महाराज फुटाणे, ह.भ.प.श्री.भगवान महाराज वरपगावकर, ह.भ.प.आचार्य श्री. विठ्ठल महाराज शास्त्री, रामायणाचार्य ह.भ.प.श्री. बाबा महाराज चारदरीकर यांच्या उपस्थितीत त्यांच्या आशीर्वादाने मंदिरावरील कळशारोहन कार्यक्रम संपन्न झाला. मंदिराच्या शिखरावरील पंचधातूच्या कळशाचा संपूर्ण खर्च गावच्या लेकीने केला त्यांना मंदिर जीर्णोद्धार समितीने पितळाच्या धातूची पंचआरती भेट दिली.

शिवमहापुराण कथा व अखंड नामजप सप्ताहाची सांगता ह.भ.प.श्री.महंत आप्पासाहेब महाराज चौरे यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने झाली.

भक्तिमय वातावरणामध्ये कळशारोहनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने पंचक्रोशीतील भाविक भक्त व ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'अंगाला हळद लावण्यापेक्षा कर्तृत्वाचा गुलाल लावलेला चांगला!'

### भावाच्या शब्दांनी मिळाली उभारी आणि बहिण झाली एमपीएससी अधिकारी!

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी सारख्या छोट्याशा गावातील कोमल आप्पाराव भोंडवेची गोष्ट कोणालाही प्रेरणा देऊ शकते! अंगाला हळद लावण्यापेक्षा कर्तृत्वाचा गुलाल लावलेला चांगला! ह्या तिच्या भावाच्या शब्दांनी तिला एक नवा दृष्टिकोन दिला, आणि त्या शब्दांमुळेच तिनं एमपीएससीच्या कठीण परीक्षेत यश संपादन केलं.



गावातील एका साध्या कुटुंबात वाढलेली कोमल, घराच्या सर्व जबाबदाऱ्या पार करत, एकाच गोष्टीवर लक्ष केंद्रित करत होती - अधिकारी बनायचं! आणि तिच्या मनात ठरलेलं तिने साध्यही केलं. तिच्या भावाने नेहमी तिला सांगितलं, मुलीचं कर्तृत्व तिच्या अंगाला लावलेल्या हळदीपेक्षा मोठं असायला हवं. आयुष्याला जिंकायचं असेल, तर कर्तृत्वाची फुलं उगवली पाहिजेत! त्याच्या शब्दांनीच तिला पुढे जाऊन ▶▶ उर्वरित पान २ वर

## वडवणी रेल्वे स्टेशनला संत सेवालाल महाराज यांचे नाव द्या-विशाल पवार

**वडवणी । प्रतिनिधी**

बंजारा, बहुजन समाजाचे आराध्य दैवत क्रांतिकारी सेवालाल महाराज हे मुळात व्यापारी असून इंग्रज काळात बजारा समाजाच्या या व्यवसायावर निर्बंध लावून लदनीचा व्यापार बंद करून इंग्रजांनी बंजारा समाजाचे पिळवणूक करण्याचा प्रयत्न केला, परंतु पराक्रमी योद्धा असणाऱ्या बंजारा समाजाने इंग्रजांशी युद्ध केला, तेव्हा क्रांतिकारी सेवालाल महाराज नावाचा पराक्रमी महापुरुष आपल्या



समाजाच्या संरक्षणसाठी व अन्याय अत्याचार वर आवाज उठून संपूर्ण देशात लदनीच्या व्यापाराने पालचा घातला, आज जी भारतभर रेल्वे लाईन आपण बघत आहे, ती रेल्वे लाईन त्याच मार्गाने तंतोतंत सेवालाल महाराजांनी मार्गक्रमण केलेला आहे. तोच रेल्वे रस्ता अहिल्यानगर ते परळी लोहमार्ग उदयास आलेले आहे. बीड जिल्ह्यातील वडवणी रेल्वे स्टेशनला क्रांतिकारी सेवालाल महाराज यांचे नाव देण्यात यावे अशी राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या बीड जिल्हा कार्याध्यक्ष विशाल पवार यांनी केली आहे.

## मंजरथ रोड रुंदी करणात नप कर्मचाऱ्यांच्या अतिक्रमणांना संरक्षण ; कुठे आहे नप चे सर्व्हेक्षण ?



- **न्याय हक्कासाठी बंद पाडले काम**

**माजलगाव । प्रतिनिधी**

काशी नंतर माजलगाव तालुक्यातील मंजरथ ला दक्षीण काशी समजल्या जाणाऱ्या मंजरथ ला तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्यात आल्याने तेथे जाण्यासाठी नवीन रस्त्याच्या रुंदीकरणासाठी माजलगाव न.प.च्या हद्दीत असलेल्या पंचशील नगर ,इंदीरा नगर भागातील नागरिकांनी केलेली अतिक्रमणे हटवण्याचे काम न.प.प्रशासना कडुन करत असताना सामान्य नागरिकांची अतिक्रमणे पाडली जाताहेत पण न.प.चे कर्मचाऱ्यां अतिक्रमणांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोप करीत समानतेने त्यांचीही अतिक्रमणे पाडण्याच्या मागणीचे निवेदन सुहास टाकणखार, राजेंद्र जावळे, धनंजय जावळे यांनी मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री यांच्या सह जिल्हाधिकारी बीड यांनी दिले होते. यात कागदी घोडे नाचवण्या पलीकडे काहिच ठोस निर्णय न.प.च्या मुख्याधिकाऱ्यां कडुन घेण्यात न आल्याने संताप व्यक्त करत संबंधित निवेदन कर्त्यांनी २५एप्रिल रोजी काम बंद केले. या बाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि,सदरील रोडचे विस्तारीकरण होत नसल्याचे २४/०१/२०२५रोजी दिलेल्या निवेदनात नमुद करण्यात आल्या नंतर मुख्याधिकारी यांनी सांगितले होते की, संबंधीत इंजीनिअर सोबत चर्चा करुन तांत्रीक दुरुस्ती करुन त्या नुसार रुंदी करणात येणारी अतिक्रमणे पाडली जातील असे आश्वासन दिले त्या नुसार इंजीनिअर यांनी सुद्धा तेच आश्वासन दिले होते. त्यात त्यांनी सांगितले होते कि,सदरील भागातील अण्णाभाऊ साठे चौका पासुन पुढे दक्षीण, उत्तर दिशे वरील दोन हि बाजुला असलेल्या प्लॉटिंगची मोजणी करुन ६०फुटांच्या रस्त्याचे सेंटर काढून त्या प्रमाणे अतिक्रमणे पाडली जातील. पण मोजणी करणारेच न.प.चे कर्मचारी आहेत ज्यांची अतिक्रमणे सेंटर च्या सिमा रेषेत येतात म्हणुन त्यांनी त्यांच्या अनाधिकृत जागा सोडुन उत्तर दिशेने जास्तीचे मार्क आऊट टाकले आहे तरीही काहीच हरकत नाही असे निवेदन कर्त्यांनी म्हटले असुन दक्षिणे कडे हि तोच निकष नप.कर्मचाऱ्यांच्या अतिक्रमणांना बाबत लावण्यात यावा अशी मागणी केली आहे.

# दैनिकाचे उपकार मुक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला

### प्रसारमाध्यमांच्या दणक्याने महावितरण ताळ्यावर एका दिवसात वीजपुरवठा सुरळीत केला : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश उपकेंद्रातील बोरखेड फिटरचे केबल ३ दिवसांपूर्वी जळाल्याने महाजनवाडी येथील शेतकऱ्यांच्या जनावरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता.काल शेतकऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी संपर्क साधुन अडचण सांगितल्यानंतर याविषयी डॉ.गणेश ढवळे यांनी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध केल्या.याची दखल घेऊन २ दिवसांपासून शेतकऱ्यांचा फोन न उचलणारे महावितरणचे अभियंता अभिजित शिंदे यांची वरीष्ठ आधिका-यांनी कानउघडणी करताच अभियंत्यांने स्वतः शेतकऱ्यांशी फोन वर संवाद साधत जळालेले केबल वायर


मराठवाडा पत्र

महावितरणच्या गलधान कारभारामुळे जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही

27 Apr 2025 - Page 4

बदलुन दिल्याने वीजपुरवठा सुरळीत झाला असुन जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटला असुन याबद्दल सरपंच विश्वंभर गिरी,भिमराव सुरवसे, युवराज सुरवसे यांनी डॉ . गणेश ढवळे यांच्याशी संवाद साधताना पेपरवाल्यांचे उपकार झाले म्हणत कृतज्ञता व्यक्त केली.

३ दिवसांपूर्वी लिंबागणेश उपकेंद्रातील बोरखेड फिटरचे केबल जळाल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता.त्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला होता. सरपंच विश्वंभर गिरी यांनी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्याशी संपर्क साधत महावितरणचे अभियंता २ दिवसांपासून फोन उचलत नसल्याने आपण लक्ष देण्याची विनंती केली. डॉ.गणेश ढवळे यांनी शेतकऱ्यांशी संवाद ▶▶ उर्वरित पान २ वर

## कत्तलीसाठी जनावरांना घेऊन जाणारा आयसर पकडला

### बीड ,गेवराईच्या गोरक्षकांची उत्कृष्ट कामगिरी



**गेवराई । प्रतिनिधी**

कत्तलीसाठी जाणाऱ्या जनावरांचे वाहन पोलिसांनी पकडून १४ म्हैस जनावरांची सुटका केली. ही कारवाई गेवराई पोलिसांनी रविवारी सायंकाळी तीन वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. अवैध कत्तलीसाठी घेऊन जाणाऱ्या आयसरवर पोलिसांनी कारवाई केली असून, याप्रकरणी पोलिसांनी दोघां जणांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून आयसर ट्रॅक असे एकूण १० लाख ६८,०००हजार रूपयांच्या मुद्देमाल हस्तगत केला असल्याची माहिती गेवराई पोलीस ठाण्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK